# प्रा. के. एम. गरडकर फेलोपदी



प्रा. गरडकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. के. एम. गरडकर यांची महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस फेलोपदी निवड झाली. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस ही राज्यातील नामांकित संस्था असून, फेलोच्या यादीत राज्यातील तसेच राज्याबाहेरील शास्त्रज्ञांचा त्यांच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनाच्या कामगिरीच्या आधारे निवड केली जाते. प्रा. गरडकर नॅनोमटेरियल्स क्षेत्रात काम करत असून, त्यांनी पाण्यातील रंगद्रव्यांचे विघटन सूर्यप्रकाशाच्या मदतीने करण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १० विद्यार्थ्यांना पीएच.डी. मिळाली असून, सध्या ८ विद्यार्थी नॅनोमटेरियल्स विषयावर काम करत आहेत. सध्या ते डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रियल केमिस्ट्रीचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

# डॉ. शर्मा 'नॅनो सायन्स'चे संचालक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स आणि बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या संचालकपदी डॉ. किरणकुमार शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ही नियुक्ती केली आहे. कुलसचिव डॉ.विलास नांदिवडेकर यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

# विद्यापीठ अधिनियम, नवे शैक्षणिक धोरण उपसमितीची उद्या सभा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अधिनियम अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी व नवीन शैक्षणिक धोरण सुधारणांसाठी नेमलेल्या उपसमितीची सभा सोमवारी (दि. १४) दुपारी १२.१५ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम - २०१६ मध्ये अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि नवे शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने करावयाच्या सुधारणांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. समितीमधील 'महाराष्ट्र स्टेट युनिव्हर्सिटी ॲक्ट इव्हॅल्युशन कमिटी' या उपसमितीची सभा १४ व १५ डिसेंबर रोजी शिवाजी विद्यापीठ येथे होणार आहे. संघटनेस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियमात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने काही सूचना असल्यास त्या meeting@unishivaji.ac.in या ई-मेल आयडीवर पाठवाव्यात. लिखित स्वरूपात सूचना बैठकीवेळी सभागृहात समितीकडे सादर कराव्यात, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# पदार्थविज्ञान विभाग प्रमुखपदी डॉ. राजपुरे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान (फिजिक्स) विभागप्रमुख म्हणून डॉ. केसू राजपुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ही नियुक्ती केली आहे. प्र-कुलगुरू म्हणून डॉ. पी.एस.पाटील यांची नियुक्ती झाली. यामुळे विभाग प्रमुखपद रिक्त झाले होते. त्या जागी डॉ. राजपुरे यांची नियुक्ती करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

# सेरिकल्चर मॉडेलचा विद्यापीठात प्रयोग

## केंद्र सरकारच्या 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' योजनेंतर्गत निवड

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशनच्या माध्यमातून पाच एकर जागेत तुतीची लागवड ते धागा निर्मितीचे 'सेरिकल्चर मॉडेल' आकाराला येणार आहे.

केंद्र शासनाच्या 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' योजनेसाठी कोल्हापूर जिल्ह्याची रेशीमसाठी निवड झाली आहे. त्याअंतर्गत हे मॉडेल साकारले जाणार आहे. 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थ्यांना मॉडेलमध्ये काम करण्याची संधी मिळेल.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा रेशीम शेतीकडे कल वाढत आहे. प्रत्येक तालुक्यातील शेतकरी कोष निर्मितीत गुंतल्याचे चित्र आहे. विशेषतः यळगूडमध्ये वर्षाला कोट्यवधीची उलाढाल करणारे शेतकरी आहेत. त्यांच्याप्रमाणे या व्यवसायात येऊ इच्छिणाऱ्यांना शास्त्रशुद्ध पद्धतीने रेशीम शेतीचे ज्ञान देण्याकरिता विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. डॉ. जाधव व प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. शांताकुमार मन्ने यांच्याकडे मॉडेलची जबाबदारी आहे.

तुतीची लागवड ते धागा निर्मिती, यांत्रिकीकरणाचे, वेगवेगळ्या मशिन्स, उत्पादकता व किटक संगोपन गृहाचे निर्जंतुकीकरण, धागा काढण्याची विविध यंत्रे, जिओ-थर्मल टेक्नॉलॉजीचा वापर, शेतकऱ्यांना प्रशिक्षण, असे उपक्रम राबविले जाणार आहेत.

> **'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' योजनेअंतर्गत देशात ५० जिल्ह्यांची निवड झाली आहे. मात्र, राज्यात निवड झालेला कोल्हापूर जिल्हा एकमेव आहे. खासदार धैर्यशील माने यांनी केंद्रिय वस्त्र मंत्रालयाशी संपर्क साधला होता. त्यामुळे जिल्ह्याची निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिलेले पाठबळ मोलाचे आहे.**
> - **डॉ. ए. डी. जाधव,** सल्लागार, क्युबा राष्ट्रीय रेशीम प्रकल्प

> **प्राथमिक स्तरावर मॉडेलच्या हालचाली सुरू आहेत. मॉडेलसाठी आवश्यक जागा विद्यापीठात असल्याने शेतकऱ्यांना रेशीम शेतीचे ज्ञान मिळणार आहे. ते उत्पादकता व गुणवत्ता वाढीला तो पोषक ठरेल.**
> - **डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



### दृष्टिक्षेपात प्रकल्प

- भारतात रेशीम अळ्यांच्या ४६६ जाती
- तुतीच्या १२९९ जाती
- वातारणात पोषक ठरणाऱ्या तुतीची विद्यापीठात होणार लागवड
- जर्मप्लाझम बँकेची होणार निर्मिती
- केंद्रिय रेशीम मंडळ व शिवाजी विद्यापीठात होणार सामंजस्य करार

# प्रा. डॉ. राजपुरे, प्रा. डॉ. शर्मा यांची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या प्रमुखपदी प्रा. डॉ. केसू यशवंत राजपुरे यांची निवड करण्यात आली. माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्र-कुलगुरूपदी निवड झाल्याने हे पद रिक्त होते. स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी विभागाचे संचालक म्हणून प्रा. डॉ. कृष्णकुमार शर्मा यांची निवड झाली.